# <u>राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक</u>

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक - १३९०/२०१८/नाशिक**

| | | |
|---|---|---|
| १ श्री. दिगंबर हरीभाऊ कोते<br>मु. पो. शिर्डी, पालखी रोड,<br>साई नागरी बँकेजवळ,<br>ता. राहाता, जि. अहमदनगर. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी तथा,<br>कक्ष अधिकारी,<br>राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक, पिनॅकल<br>मॉल, चौथा मजला, त्र्यंबकनाका सिग्नलजवळ,<br>जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२. | : | प्रतिवादी |
| २ प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>उप सचिव,<br>राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक, पिनॅकल<br>मॉल, चौथा मजला, त्र्यंबकनाका सिग्नलजवळ,<br>जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२. | : | प्रतिवादी |

**ऑनलाईन सुनावणी दिनांक – २४/०६/२०२०**

अपिलार्थी यांनी दिनांक २९/०५/२०१८ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. त्यामध्ये दिनांक २४/०६/२०२० रोजी आयोजित meet.google.com/mpd-wehj-sgg ऑनलाईन सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित होते. तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित होते. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक ११/०१/२०१८ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी उडवाउडवीची उत्तर दिली. त्यामुळे प्रस्तुत द्वितीय अपील दाखल करावे लागले.

सुनावणीदरम्यान तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक ११/०१/२०१८ रोजीच्या माहिती अर्जान्वये सप्टेंबर २०१७ ते दिनांक ११/०१/२०१८ या कालावधीतील सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई- ०३२ यांनी दिनांक २९/०८/२०१७ रोजीचा तक्रार अर्ज विषयानुरुप ई. ऑफिस

क्रमांक २६०३८५९/२०१७/com/TAPAL दिनांक ०५/१०/२०१७ रोजी विभागाकडे वर्ग केलेला आहे, त्या अर्जाबाबत झालेल्या कार्यवाही अहवालाच्या प्रती साक्षांकित स्वरुपात मिळाव्यात याबाबत माहिती मागितली होती. त्यास अनुसरुन अपिलार्थीस दिनांक १६/०२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये "आपला दिनांक २९/०८/२०१७ रोजीचा तक्रार अर्ज अवर सचिव (कार्यासन-६), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून दिनांक १७/११/२०१७ रोजीच्या पत्रान्वये दिनांक २३/११/२०१७ रोजी प्राप्त झाला आहे. प्रस्तुत तक्रार अर्जातील नमूद केल्यानुसार त्यासंदर्भातील बाबी या मा.आयुक्त महोदय यांच्या अवलोकनार्थ तथा माहितीस्तव सादर करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार तक्रार अर्जाबाबत अंतिम कार्यवाही झालेवर त्याबाबत आपणास स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल", असे कळविले.तद्नंतर अपिलार्थी यांनी दिनांक १९/०३/२०१८ अन्वये प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीदरम्यान विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक १९/०३/२०१८ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३/०४/२०१८ रोजी निर्णय पारित करुन जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य ठरवून प्रथम अपील निकाली काढले.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक ११/०१/२०१८ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस माहितीबाबत वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे स्पष्ट होते. तसेच अपिलार्थी यांनी सदर तक्रार अर्ज हा सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय मुंबई- ०३२ या कार्यालयाकडे केलेला आहे. त्यामुळे सदर तक्रार अर्जावर कार्यवाही करणे ही बाब राज्य माहिती आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही, ही बाब विचारात घेता अपील निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये केलेली कार्यवाही योग्य असून प्रस्तुत अपिलात काही तथ्य नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक १३९०/२०१८/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

(के.एल.बिश्नोई)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक